PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Preliminary Examination (2024-25)

## Standard - X

**Subject - MARATHI** **Marks - 80**
**Date - 10/01/2025** **Time : 8:15 am to 11:15 am**

### विभाग १ - गद्य

**प्र. १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकतं. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं. ते नसेल तर पक्ष्यांचं सुमधुर संगीत साथीला असतंच. अशा आल्हादायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमाचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला– 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.'

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या–पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

**१) आकृती पूर्ण करा.** **(२)**

भडसावळे गुरुजींच्या मते सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते. कारण...

१) ____________
२) ____________
३) ____________
४) ____________

**२) एका वाक्यांत उत्तरे लिहा** **(२)**

१) निरंजन कोणाच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा ?

२) भडसावळे गुरुजींनी निरंजनला कोणाच्या घरी वार लावून दिले ?

**स्वमत– ३) तुम्हाला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.** **(३)**

## प्र. १ (आ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

शाळा आणि शिक्षक असा विषय निघाला, की मला माझी मुंबईतील शाळा आणि शालेय जीवनातील शिक्षकांची आठवण येते. गिरगावातील युनियन हायस्कूल आणि माझ्या शाळकरी वयात आपुलकीनं संस्कार करणारे भावे सर, जोशी सर, शिर्के सर या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे; पण त्याचवेळी हेही सांगितलं पाहिजे, की या शाळेशी आणि या संस्कार देणाऱ्या शिक्षकांशी माझा जो संपर्क आला, तो जिच्यामुळे आला ती माझी परमप्रिय आई आणि माझे मामा यांचे ऋण मी कसे व्यक्त करणार? आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते. माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर सर्वस्व होती.

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याचा आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधून मधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हाला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहाचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणे शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

**१) चौकटी पूर्ण करा.** **(२)**

१) लेखकाचे मूळ गाव – [ ]

२) दारिद्र्याशी संघर्ष करणारी – [ ]

३) अनवाणी शाळेत जाणारे – [ ]

४) गिरगावातील शाळेचे नाव – [ ]

**२) आकृती पूर्ण करा** **(२)**

लेखकाची खेतवाडीतील प्राथमिक शाळा अशी होती...

१. [ ] २. [ ]

**३) स्वमत-** **(३)**

**तुमच्या शाळेविषयी ७-८ वाक्यांत माहिती लिहा**

## (इ) खालील अपठित उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.

कन्याकुमारी हे एक सुंदर स्थान आहे. ते तीन बाजूंनी समुद्राने वेढलेले आहे. दक्षिणेकडे हिंदी महासागर पसरलेला आहे; पूर्वेला बंगालचा उपसागर आहे. आणि पश्चिमेला अरबी समुद्र. देशाच्या अनेक भागांतले यात्रेकरू येथे तीन समुद्रांच्या संगमाच्या ठिकाणी स्नान करण्यासाठी आणि मंदिरात पूजा करण्यासाठी येतात. कन्याकुमारी भोवतालचा समुद्र सर्वसाधारणपणे शांत असतो; भेट देणाऱ्या अनेकांना जाणवले आहे की, या जागी एक विशिष्ट शांतता आणि स्तब्धता सदैव वसते. या ठिकाणच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी सूर्योदयाच्या आणि सूर्यास्ताच्या वेळा या सर्वोत्तम वेळा होत. सूर्य सकाळी बंगालच्या उपसागरातून उगवतो आणि संध्याकाळी अरबी समुद्रात मावळतो. खरं तर भारतात हे एकच असे ठिकाण आहे की, जेथून सूर्य समुद्रात उगवताना आणि समुद्रात मावळताना पाहता येतो. कन्याकुमारीला येणारे अनेकजण पौर्णिमेच्या दिवशी येतात. त्यांना दोन अग्निगोलांसारखे दिसणारे अरबी समुद्रात बुडणारा सूर्य आणि बंगालच्या उपसागरातून वर येणारा चंद्र एकाच वेळी पाहता येतात.

**१) चौकटी पूर्ण करा.** **(२)**

i) कन्याकुमारीच्या दक्षिणेकडे – [ ]

ii) कन्याकुमारीला पूर्वेला – [ ]

**२) उताऱ्यात आलेली कन्याकुमारीविषयीची माहिती तुमच्या शब्दांत लिहा.** **(२)**

## विभाग २ - पद्य

**प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती पूर्ण करा.**

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी...

धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी..
रंग मजेचे, रंग उदयाचे

उधळू, फेकू बिया डोंगरी, रूजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उदयाचे

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

**१) आकृती पूर्ण करा.** **(२)**

आभाळातून वृष्टी केव्हा होईल ?.............

१. [ ] २. [ ]

**२) एका वाक्यांत उत्तरे लिहा.** **(२)**

१) यंत्रांच्या संगतीने काय मिळेल ?

२) खळाळते पाणी कोठून वाहते ?

**३) चौकटी पूर्ण करा.** **(२)**

१) जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण – [ ]

२) कवयित्रीच्या मते जपून ठेवायची गोष्ट – [ ]

**४)** धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू **(२)**

मातीमध्ये जे हात राबती, तयास देऊ पुष्टी

**वरील ओळींचा तुमच्या शब्दात अर्थ लिहा.**

**आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेचे रसग्रहण करा.**

| **औक्षण** | **हिरवंगार झाडासारखं** | |
|---|---|---|
| १) कवितेचे कवी / कवयित्री | १) कवितेचे कवी / कवयित्री | **(१)** |
| २) कवितेचा रचनाप्रकार | २) कवितेचा रचनाप्रकार | **(१)** |
| ३) कवितेचा विषय | ३) कवितेचा विषय | **(१)** |
| ४) कवितेतील आवडलेली ओळ | ४) कवितेतील आवडलेली ओळ | **(१)** |
| ५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे | ५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे | **(२)** |
| ६) खालील शब्दांचे अर्थ लिहा<br>१) झाड, २) वस्त्र, ३) मरगळ, ४) मौनव्रत | ६) खालील शब्दांचे अर्थ लिहा<br>१) औक्षण, २) डोळे, ३) आसवे, ४) राखण | **(२)** |

## विभाग ३ - स्थूलवाचन

**प्र. ३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा** **(६)**

**१) टिपा लिहा.**


i) सॅग्वारो कॅक्टसचे दिसणे.

ii) सॅग्वारो कॅक्टसचे उपयोग

**२) व्युत्पत्ती कोशाचे कार्य लिहा.**

**३) 'जाता अस्ताला' या पाठाच्या आधारे सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.**

**४) पुढील मुद्द्यांच्या आधारे एक परिच्छेद तयार करा-**




## विभाग ४ - व्याकरण

**प्र. ४ (अ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा** **(२)**

१) तुम्ही सकाळी कधी उठता ?

२) तो नियमित अभ्यास करतो ?

**(आ) कंसातील सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा** **(२)**

१) काल रात्री खूप थंडी होती (उद्गारार्थी करा.)

२) ही काही वाईट कल्पना नाही (होकारार्थी करा.)

**(इ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (कोणतेही दोन)** **(४)**

१) उत्साहाला उधाण येणे –

२) अंगाचा तिळपापड होणे –

३) हातभार लावणे –

४) आदेश देणे –

**(ई) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा (कोणतेही दोन)** **(१)**

१) स्त्री २) रात्र

३) द्रव्य ४) वृष्टी

**(उ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा (कोणतेही दोन)** **(१)**

१) आनंद X २) कोरडा X

३) सावध X ४) पास X

**(ऊ) खालील शब्दांचे वचन बदला (कोणतेही दोन)** **(१)**

१) वही २) शहर

३) पाऊल ४) डोंगर

**(ए) खालील शब्दांचे लिंग बदला (कोणतेही दोन)** **(१)**

१) नवरा २) बालमित्र

३) वाघ ४) आई

**(ऐ) खालील वाक्यांतील विरामचिन्हे शोधून त्यांची नावे लिहा.** **(१)**

वाक्य – १) मावशी, तुम्ही राहता कुठं?

| | विरामचिन्हे | नावे |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |

**ओ) खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(१)**

१) समाजाची सेवा करणारा –

२) भाषण देणारी व्यक्ती –

**औ) खालील वाक्ये लेखननियमानुसार लिहा.** **(२)**

१) अनेक खेलाडू पाहण्याची मला रोज संधि मिळू लागली.

२) निरंजनने तो दघड उचलून बाजुला ठेवला.

## विभाग ५ - उपयोजित लेखन

**प्र. ५ अ) पत्रलेखन – खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** **(६)**

१) गणेशोत्सवात लावल्या जाणाऱ्या 'लाऊड स्पीकर'मुळे आजूबाजूच्या परिसरात ध्वनिप्रदूषण होत आहे. त्याची कल्पना तुमच्या परिसरातील पोलीस चौकीला देण्यासाठी तक्रारपत्र लिहा.

**किंवा**

२) गणेशोत्सवानिमित्ताने मंडळाने आयोजित केलेल्या संगीत स्पर्धेमध्ये तुमच्या मित्राचा / मैत्रिणीचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

३) विभाग १ – गद्य – प्रश्न १ मधील 'इ' या प्रश्नाचा (अपठित उतारा) १/३ सारांश लिहा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

१) **जाहिरात लेखन –** अंध मुलांनी दिवाळीसाठी तयार केलेल्या विविध वस्तूंच्या प्रदर्शनाची जाहिरात तयार करा.

२) **बातमी लेखन –** शाळेत साजऱ्या झालेल्या स्नेहसंमेलनाची बातमी तयार करा.

**३) खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा व कथेला योग्य शीर्षक देऊन तात्पर्यही लिहा.**

**मुद्दे –** एक अनाथ मुलगी---------- शिकण्याची इच्छा ---------- शाळेचा खर्च करणे अशक्य ---------- तिला कल्पना सुचणे ---------- आपल्या वर्गशिक्षकांना कल्पना देणे ---------- तिला शिलाई मशिन मिळणे ---------- सुट्टीच्या दिवशी छोटी छोटी कामे करून देणे ---------- शाळेच्या खर्चासोबत, घरखर्चालाही हातभार लावणे.

**इ) कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळीत निबंध लिहा.** **(८)**

१) वैचारिक – 'मानवता हाच खरा धर्म'.

२) आत्मकथन – सायकलचे आत्मवृत्त.

३) प्रसंगलेखन – शाळेतील इ. १०वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व कौतुक समारंभ आयोजित केला होता. याप्रसंगी तुम्ही उपस्थित होता. या प्रसंगाचे वर्णन करा.

■■■